


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक १३१, गुरुवार १ फेब्रुवारी २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# साखर, डाळीपेक्षा ७० कोटींची विकास कामे फायदेशीर!

■ आ. नीलेश लंके यांनी खा. विखे यांना पुन्हा घेरले
■ निघोजमध्ये २० कोटी ५१ लाख रूपयांच्या कामांचे भुमिपूजन



■ निघोज येथील २० कोटी ५१ लाख रूपये खर्चाच्या विकास कामांचा आ. नीलेश लंके यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आल्यानंतर त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. (छाया : जयसिंग हरेल)

निघोज : संदीप इधाटे

**निवडणूक जवळ आल्याने साखर, डाळीचे वाटप करण्यात येत आहे. मात्र साखर व डाळीपेक्षा निघोजमध्ये आतापर्यंत आपणाकडून करण्यात आलेली ७० कोटी ११ लाख रूपयांची विकास कामे कधीही फायदेशीर असल्याचे सांगत आमदार नीलेश लंके यांनी खा. डॉ. सुजय विखे यांना साखर, डाळ वितरणावरून पुन्हा एकदा घेरले.**

निघोजमधील २० कोटी ५१ लाख रूपयांच्या विविध विकास कामांचे आ. लंके यांच्या हस्ते भुमिपूजन करण्यात आले. त्यानिमित्त मळगंगा मंदिरासमोर झालेल्या जाहिर सभेत आ. लंके यांनी खा. डॉ. सुजय विखे यांच्यावर सडकून टीका केली. मळगंगा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकरशेठ कवाद हे कार्यक्रमाच्या अध्यस्स्थानी होते.

आ. लंके म्हणाले, काल परवा साखर, डाळ वाटणारांना डोक्यावर घेऊन नाचत होते. त्यांनी तुम्हाला काय विकास कामे दिली याचा विचार जनतेचे करणे गरजेचे आहे. गर्दी जमा होत नसल्याने शालेय विद्यार्थ्यांना जमा करून शक्तीप्रदर्शन करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला गेल्याची टीका करीत जे बोलतो तेच करतो आणि जे करतो तेच मी बोलतो असे ते म्हणाले. आतापर्यंत कधीही झाली नाहीत इतकी विकास कामे तालुक्यात व निघोजमध्ये झाली आहेत.निघोजच्या जनतेसाठी जगप्रसिध्द रांजणखळगे येथील विकास कामे, निघोज-पिंपरीजलसेन रस्ता, शाळा खोल्या, जलसिंचन बंधारे यासाठी २० कोटी ५१ लाख रूपयांचा निधी खर्च होणार असून येत्या सहा महिन्यात आणखी विकास कामे मार्गी लागतील अशी ग्वाही देतानाच या ठिकाणी स्व. बाबासाहेब कवाद यांच्या स्मृती जतन करण्यासाठी त्यांच्या नावाने सभागृह उभारण्याची घोषणा आ. लंके यांनी यावेळी केली.

यावेळी विविध संस्था, सामाजिक मंडळे तसेच मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या वतीने आ. लंके यांचा सत्कार प्रभाकर कवाद, उपाध्यक्ष शांताराम लंके, ज्ञानदेव लंके, सोमनाथ वरखडे यांच्या हस्ते करण्यात आला. सोमनाथ वरखडे व प्रसिध्द निवेदक लहूशेठ साबळे यांनी केले. मळगंगा ट्रस्टचे सचिव शांताराम लंके यांनी आभार मानले.

यावेळी शांताराम लंके, अमृताशेठ रसाळ, सोमनाथ वरखडे, ज्ञानेश्वर उर्फ बाळासाहेब लंके, वसंत कवाद, नामदेवराव थोरात, ज्ञानदेव लंके, शांताराम कळसकर, रामदास वरखडे, ॲड. बाळासाहेब लामखडे, मंगेश लंके, शिवाजीराव वराळ, शंकरराव लामखडे, बबनराव ससाणे, विश्वास शेटे, माजी सरपंच चंद्रकांत लामखडे, सुदाम पवार, दिपक लंके, अनिल गंधाक्ते, संदीप चौधरी, प्रमोद मोहिते, खंडू भुकन, रविंद्र राजदेव, ज्ञानेश्वर कवाद, चंद्रकांत लंके, दत्तात्रेय गुंड, रामदास लंके, सुनील वराळ, शांताराम लाळगे, वसंत ढवण, शिवाजीराव लंके, दिलीप ढवण, भाऊसाहेब लामखडे, विष्णू लोखंडे, सतिष साळवे, बाबाजी वाघमारे, ठकाराम लंके, दिगंबर लाळगे, गणेश कवाद, भावना सुधामती कवाद, अनिल लामखडे, कुशाभाऊ कवाद, हिराभाऊ कवाद, दत्ता लंके, सचिन लंके, पांडूरंग लंके, किसनराव लंके, आबाजी लंके, बाबाजी लंके यांच्यासह मोठा जनसमुदाय यावेळी उपस्थित होता.

## अभ्यासिकेचा ताबा द्या

शरदचंद्र पवार अभ्यासिका उभारण्यासाठी सव्वा कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला. विद्यार्थ्यांची सोय व्हावी हा त्यामागील हेतू आहे. इमारत पुर्ण होउन वर्ष झाले असतानाही तिथे फर्निचर करण्यात आलेले नाही. ग्रामपंचायतीने अभ्यासिकेचा ताबा मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टकडे द्यावा आपण फर्निचरसाठी २५ लाख रूपयांचा निधी उपलब्ध करून देऊ अशी ग्वाही देतानाच स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना या अभ्यासिकेचा लाभ व्हावा व तालुक्याचा लौकीक राज्यात व्हावा यासाठी आपला प्रयत्न असल्याचे लंके म्हणाले.

## एका मतदारामागे ६१ हजार निधी !

निघोजमध्ये आजवर ७० कोटी ११ लाख रूपयांचा निधी देण्यात आला असून साडेअकरा हजार मतदानाचा विचार केला तर प्रत्येक मतदारामागे ६१ हजार रूपये निधी देण्यात आला आहे. साखर, डाळ वितरणापेक्षा हे कधीही उजवे असल्याचा टोला लंके यांनी यावेळी लगावला.

## निघोजच्या प्रेमातून उतराई

निघोजने फार प्रेम केले, प्रेमातून उतराई होण्यासाठी निघोजच्या इतिहासात प्रथमच कोटयावधी रूपयांची विकास कामे मार्गी लागली आहेत.निघोजच्या सुवर्ण अक्षरात लिहून ठेवण्यासारखा हा दिवस आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर प्रथमच इतक्या मोठया प्रमाणात निधी आला.

## निघोज गट आ. लंकेंच्या पाठीशी

आ. नीलेश लंके यांनी साडेचार वर्षात मोठया प्रमाणावर विकास कामे मार्गी लावली असून निघोजच्या जनतेने त्यांच्यावर मनापासून प्रेम केल्यानेच निघोजमध्ये रेकॉर्ड ब्रेक विकास कामे झाली आहे. यापुढील काळातही निघोज जिल्हा परिषद गट आ. लंके यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिल याची खात्री आहे.

**बापूसाहेब शिर्के**
उपसभापती, बाजार समिती

## उत्तरेचे पार्सल पाठवायचे आहे !

आ. नीलेश लंके किंवा राणीताई लंके यांच्यापैकी एक लोकसभेचा उमेदवार असेल. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व पवार साहेब यांचे लंके यांना भक्कम पाठबळ असेल. काँग्रेस विचारधारेची निघोजची जनता लंके यांना लोकसभेत पाठविण्यासाठी सर्वात पुढे राहणार असून उत्तरेचे पार्सल आपणास उत्तरेला पाठवायचे आहे.

**अशोक सावंत**
अध्यक्ष निळोबाराय देवस्थान ट्रस्ट

## शायरी करीत साखर, गुळ वाटपावर टीका

युवक काँग्रेसचे पदाधिकारी जितेश सरडे यांनी हिंदी, उर्दू शेरोशयरी करीत विखे यांच्या डाळ व साखर वाटपाचा जोरदार समाचार घेतला. आ. लंके यांच्यासारखा कार्यक्षम व कार्यसम्राट आमदार आपणास लाभला हे मतदारसंघाचे भाग्य असून लोकसभा निवडणूकीसाठी जनता सज्ज झाली असून लंके हे खासदार होणार असल्याचे सरडे यांनी ठामपणे सांगितले.

## सक्षम नेतृत्व

आ. लंके यांनी केलेल्या विकास कामांचे कौतुक करीत निघोज पतसंस्थेचे चेअरमन वसंत कवाद यांनी कोटयावधींच्या विकास कामांसोबतच सर्वसामान्य जनतेच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी आ. लंके यांचे नेतृत्व सक्षम असल्याचे सांगितले.

## निघोजकरांची साथ लंके यांनाच

कार्यक्रमाचे अध्यक्ष मळगंगा ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकरशेठ कवाद यांनरी आ. नीलेश लंके यांनी साडेचार वर्षात विक्रमी निधी दिल्याबद्दल धन्यवाद दिले. लंके यांच्यावर निघोजच्या जनतेने मनापासून प्रेम केले असून यापुढील काळातही निघोजकर लंके यांनाचा साथ देणार असल्याचे कवाद म्हणाले.

# कुजलेले अन्न खाल्ल्याने १७० मेंढया दगावल्या

■ वनकुटे येथील मेंढपाळाचे मोठे नुकसान ■ मावळ तालुक्यातील जेवरेवाडी, करंडोली येथील घटना ■ नीलेश लंके मेंढपाळ कल्याणकारी संघटनेच्या वतीने मदत संकलन सुरू

जेवरेवाडी, मावळ : विशेष प्रतिनिधी

**कुजलेले व शिळे अन्न खाल्ल्याने तालुक्यातील वनकुटे येथील शेतकरी काळूराम शिवाजी बरकडे यांच्या १७० शेळया-मेंढया दगावल्या. मावळ तालुक्यातील जेवरेवाडी, करंडोली येथे बरकडे यांचा वाडा गेल्या तीन महिन्यांपासून मावळामध्ये वास्तव्यास आहे.**



■ कुजलेले अन्न खाल्ल्याने काळूराम बरकडे यांच्या १७० शेळया मेंढया दगावल्या.

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार जेवरेवाडी, करंडोली येथील सुर्यकांत बबन शेलार यांच्या शेतामध्ये दि. २८ जानेवारीपासून बरकडे यांचा वाडा मुक्कामी आहे. त्यांच्या कळपामध्ये १६ नर मेंढया, २४ दुधाळ मेंढया, ९२ गाभन मेंढया, ९० नर करडे, ७० मादी करडे, ८३ भाकड मेंढया असा ३७५ मेंढीवर्ग तर १२ दुधाळ शेळया, १४ गाभण शेळया, ७ नर करडे, ५ मादी करडे, १२ बोकड असे ५० शेळी वर्ग व १ खिलार गाय अशी एकूण ४३१ जनावरे होती.

दि. २८ जानेवारीच्या सायंकाळपर्यंत ही सर्व जनावरे निरोगी होती. तथापी २९ जानेवारी रोजी पहाटे २ ते ३ च्या सुमारास काही मेंढया फुगल्या तर काही मृतावस्थेत आढळून आल्या. त्यामुळे बरकडे यांनी उर्वरीत पान ३ वर

## लंके प्रतिष्ठाणचे आवाहन

मोठया प्रमाणावर शेळया मेंढया दगावल्याने बरकडे कुटूंब उघडयावर पडले आहे. अजूनही काही शेळया, मेंढया अस्वस्थ आहेत. या कुटूंबाला मदत करण्याचे आवाहन नीलेश लंके मेंढपाळ कल्याणकारी संघटनेच्या वतीने करण्यात आले असून आतापर्यंत हजारो रूपयांची मदत संकलीत झाली आहे.

# 'नगर अर्बन'च्या संचालकांच्या मालमत्तेचा होणार लिलाव?

■ पोलिसांनी उगारला कारवाईचा बडगा
■ अशोककाकांसह दोन संचालक कोठडीत

नगर : प्रतिनिधी




**नगर अर्बन गैरव्यवहार प्रकरणातील आरोपींवर पोलिसांनी आता कारवाईचा बडगा उगारला आहे. सध्या अनेकांची धरपकड सुरु आहे. यामध्ये आता आरोपी असणाऱ्या माजी संचालकांचाही समावेश आहे.**

तीन माजी संचालक सध्या पोलिसांच्या ताब्यात आहेत. आता नगर अर्बनच्या आरोपी संचालकांच्या मालमत्तांचा लिलाव होणार असल्याची माहिती मिळाली आहे. यातून येणाऱ्या पैशांतून ठेवी परत करण्यात येतील असेही समजत आहे.

आरोपी असलेल्या माजी संचालकांच्या मालमत्तांबाबतची माहिती दुय्यम निबंधक कार्यालयाकडून मागविण्यात आली आहे. तसे पत्र आर्थिक गुन्हे शाखेकडून देण्यात आले आहे. नगर अर्बन गैरव्यवहारप्रकरणी माजी अध्यक्ष अशोक कटारियासह दोन माजी संचालकांना अटक करण्यात आली आहे.त्यांची चौकशी पोलिसांकडून सुरू आहे. यात शंभरहून अधिक आरोपींचा समावेश आहे. बँकेचे तत्कालीन अधिकारी व संचालकांनी संगनमताने २९१ कोटींचा गैरव्यवहार केल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. उर्वरित आरोपींचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. मात्र, अनेक जण फरार झाले असल्याचे समजते.

**मालमत्तांची मागितली माहिती**

अनेक ठेवीदारांच्या कोट्यवधींच्या ठेवी या बँकेत अडकल्या आहेत. पोलिसांना जो फॉरेन्सिक ऑडिटचा अहवाल प्राप्त झालाय त्यावरून यातील सहभागी असणारे आरोपी समोर आले आहेत. आधारे पोलिसांनी आरोपींच्या मालमत्तेबाबतची माहिती मागविली आहे.मालमत्ता खरेदी-विक्रीची दुय्यम निबंधक कार्यालयात नोंद असते. आर्थिक गुन्हे शाखेकडून आरोपींची नावे कळविण्यात आली असून, त्यांच्या मालमत्तांची माहिती मागविण्यात आली आहे. ही माहिती आर्थिक गुन्हे शाखेकडून जिल्हा प्रशासनाला दिली जाणार आहे.

जिल्हा प्रशासनाकडून उर्वरीत पान ३ वर

# जिल्हा सहकारी बँकेने पतसंस्थांना कॅश क्रेडिट सुविधा द्यावी

पतसंस्था चळवळ टिकवण्यासाठी प्रशांत गायकवाड व शिष्टमंडळाचे सहकार मंत्र्यांना निवेदन



■ पतसंस्था चळवळ टिकवण्यासाठी, आर्थिक सुस्थितीतील पतसंस्थांना जिल्हा सहकारी बँकेमार्फत कॅश क्रेडिट सुविधा उपलब्ध करून देण्याची परवानगी द्यावी अशी मागणी जिल्हा सहकारी बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड व शिष्टमंडळाने सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांची भेट घेऊन केली.

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यासह जिल्ह्यातील पतसंस्था चळवळ टिकवण्यासाठी, आर्थिक सुस्थितीतील पतसंस्थांना ताळेबंदाच्या आधारावर जिल्हा सहकारी बँकेमार्फत कॅश क्रेडिट सुविधा उपलब्ध करून देण्याची परवानगी द्यावी अशी मागणी जिल्हा सहकारी बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड व शिष्टमंडळाने सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांची भेट घेऊन केली.**


शिष्टमंडळात जिल्हा बँकेचे जेष्ठ संचालक सीताराम गायकर, सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे, जिल्हा बँकेच्या संचालिका गीतांजली शेळके यांचा समावेश होता.

यावेळी मंत्री वळसे पाटील यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आर्थिक गैरव्यवहार व अनियमित कारभारामुळे पारनेर तालुक्यातील दोन पतसंस्था अडचणीत आल्या आहेत.त्यामुळे पतसंस्था क्षेत्रात अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.त्याचा फटका भक्कम आर्थिक स्थिती असलेल्या पतसंस्थांना बसला आहे.त्यामुळे तालुक्यात आर्थिक कोंडी निर्माण झाली असून ही कोंडी फोडण्यासाठी व या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी सुस्थितीतील पतसंस्थांना जिल्हा सहकारी बँकेमार्फत कॅश क्रेडिट तसेच इतर आर्थिक सुविधा देण्याची परवानगी कायद्याच्या आधीन राहून राज्यात सहकार विभागात धोरणात्मक काही बदल करूनदेण्यात यावी अशी मागणी निवेदनात करण्यात

उर्वरीत पान ३ वर

# वकिल संरक्षण कायद्याची मागणी करणार

आ. नीलेश लंके यांची ग्वाही




■ वकिल संरक्षण कायदा लागू करण्याच्या मागणीसाठी धरणे आंदोलन करणाऱ्या वकिलांची भेट घेऊन आ. नीलेश लंके यांनी पाठिंबा जाहिर केला.

नगर : प्रतिनिधी

**वकिल संरक्षण कायदा करण्यासाठी आपण मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन आमदार या नात्याने साकडे घालणार असल्याचे आमदार नीलेश लंके यांनी सांगितले.**

राहुरी येथील वकिल दाम्पत्याची हत्या झाल्यानंतर राज्यभर वकिलांचे धरणे आंदोलन सुरू असून येत्या ३ फेब्रुवारीपर्यंत वकिलांनी कामकाजावर बहिष्कार टाकला आहे. बुधवारी सकाळी आ. लंके यांनी नगर येथील जिल्हा न्यायालयात धरणे आंदोलन करणाऱ्या वकिलांची भेट घेऊन आपण त्यांच्यासोबत असल्याची ग्वाही दिली. त्यानंतर राहुरी येथेही आ. लंके यांनी भेट देत वकिल दाम्पत्याच्या हत्येचा निषेध केला.

वकिलांवर होणाऱ्या हल्ल्यांमध्ये मोठया प्रमाणावर वाढ होत असून ही चिंतेची बाब आहे. वकिलांना निर्भयपणे काम करण्यासाठी राज्यामध्ये तातडीने वकिल संरक्षण कायदा होणे गरजेचे आहे. त्यासाठीच आपण लवकरात लवकर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन हा कायदा लागू करण्याची आग्रही मागणी करणार असल्याचे सांगितले. यावेळी वकील संघटनेचे पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.



# युवा

## मनाशी काही गोष्टी ठरवा!

**बऱ्याच घरांमध्ये लग्न झाल्या झाल्या एक वर्षात सासूशी भांडण आणि वाद होत असल्यामुळे वेगळं झाल्याची अनेक उदाहरणे आपल्याकडे पाहायला मिळतात, तर काही जणी समाजामध्ये काय बोलतील या भीतीने सासूचे टोमणे आणि त्रास सहन करत तशाच राहतात. पण तुम्हालाही लग्न झाल्यानंतर सासूबरोबर राहताना स्वतःला शांत ठेवायचे असेल तर तुम्ही लग्नाआधीपासूनच मनाशी काही गोष्टी नक्की करून घ्या. या टिप्स तुम्ही ठरवल्यात आणि त्याप्रमाणे तुम्ही वागलात तर नक्कीच तुम्हाला सासूमुळे घरात वाद झाले तरीही त्रास करून घेणे जरा कमी होईल...**



### स्वतःच्या बाजूने ठाम उभे राहा

तुमच्या आयुष्यात लग्न झाल्यानंतर अशी वेळ कितीतरी वेळा येऊ शकते जिथे तुम्हाला सासूला न विचारता काही निर्णय परस्पर घ्यावे लागतील. अशा स्थितीत तुम्ही सासूला घाबरून अथवा पुढे काय होईल याचा विचार करून गप्प बसू नका. तुम्ही अत्यंत सौम्यपणे परिणामांसह नक्की परिस्थिती काय होती हे ठामपणाने मांडायला शिका. उलटून न बोलता अत्यंत शांतपणाने व्यवस्थित सविस्तरपणे आपली बाजू मांडणे आणि स्वतःच्या बाजून ठामपणे उभे राहायला शिका. तुम्ही शांत राहिलात तर सासूलादेखील शांत राहणे भाग आहे. त्यामुळे नाहक होणारा वाद टळतो.

### नवऱ्याबरोबर वितुष्ट नको

आपली सासू आपल्याबरोबर कशी वागते हे तुमच्या नवऱ्याला माहीत असेलही वा नसलेही. पण तुम्ही जे काही घडलं आहे हे एकदा शांतपणे बसून त्यांना सांगणे गरजेचे आहे. पण तुमच्याशी जर तुमचा नवरा सहमत नसेल तर तुम्ही चिडचिड करू नका. ती त्याची आई असल्यामुळे तुमची प्रत्येक गोष्ट ऐकणं शक्य नाही. पण याचा अर्थ त्याच्यासह नात्यात वितुष्ट येईल असे वागू नका. कारण त्यामुळे तुम्हालाच अधिक त्रास होणार आहे हे लक्षात घ्या. पण असे जरी असेल तर नवऱ्याला त्याच्या आईची चूक लक्षात येईल हे चांगुलपणाने तुम्ही नक्कीच दाखवून देऊ शकता.



### हसून द्या योग्य उत्तर

काही सासू अशा असतात ज्यांना आपल्या सुनेच्या माहेरच्या लोकांबद्दल बोलायची खूपच खोड असते. असे ऐकल्यानंतर सुनेला राग येणे साहजिक आहे. पण तोंड वेडेवाकडे करून अथवा भांडून बोलण्यापेक्षा तुम्ही हसत हसतच त्या गोष्टीला उलट उत्तर कसं देता येईल हे शिकून घ्या. खेळकर वातावरण ठेऊनच तशीच उत्तरे द्यावीत आणि समोरच्याचे तोंड बंद करावे याची काळजी घ्या. तसंच तुम्हाला एखाद्या गोष्टीने मनाला वाईट असेल अथवा तुमच्या मागे तुमच्याबद्दल कोणालाही काही सांगण्यात येत असेल आणि तुम्हाला ते कळले तर सरळ एकदाच समोर जाऊन शांतपणे त्याबाबत सांगावे. या गोष्टी नमूद कराव्यात. पण तुमचे नाते घरात कसेही असेल तरीही दुनियेसमोर मात्र ते दाखवून देऊ नका. कोणत्याही कार्यक्रमात गेल्यानंतर सासूशी वाईट वर्तणूक करू नये. कारण तसे केल्यास, तुम्ही समजदार नाही असाच गैरसमज समाजात होतो. कोणत्याही घरात सासू आणि सुनेच्या वादाने अत्यंत गंभीर रूप घेतले तर तुम्ही घाबरून जाऊ नका. अन्याय सहन करणे हे चुकीचे आहे. तुम्हाला मानसिक अथवा शारीरिक त्रास होत असेल तर तुम्ही त्वरीत हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधून हिंसेविरुद्ध नक्की आवाज उठवा. यासाठी अनेकजण मदतीसाठी उपलब्ध असतात. त्यामध्ये सेंट्रल सोशल वेल्फेअर बोर्ड, पोलीस हेल्पलाईन, विविध एनजीओ यांचाही समावेश आहे.



## काही तरी जळतंय...

**खरंतर सोनिया आणि रचना यांची इतकी छान मैत्री, वास्तविक त्या दोघी जावा-जावा... पण तसं कुठेही जाणवायचं नाही. उलट त्यांच्यातली मैत्री अधिक जास्त अधोरेखित व्हायची. अलीकडे मात्र रचनाची खूप घालमेल व्हायची. सोनिया, तिची मुलं यांची होणारी प्रगती, आपल्या दिराची सुधारत जाणारी आर्थिक परिस्थिती आणि कुटुंबातलं त्यांचं वाढत जाणारं महत्त्व यामुळे आपल्याला वाईट का वाटतंय? खरं म्हणजे आनंद व्हायला हवा. आपलं आणि सोनियाचं किती पटतं. आपल्याला असं वाटणं ही जेलसी आहे का? नाही...नाही... मी इतकी संकुचित विचारांची थोडीच आहे? पण मग माझं मन असं का सांगतंय की तू जेलस फील करते आहेस आणि सगळ्या जगाला समजू शकणारी मी, माझ्या भावना नक्कीच ओळखू शकतेय. हो... ही जेलसीचं, ठाण मांडून बसलीय मनात. कसं काढू तिला बाहेर हा प्रश्न रचनाला सैरभैर करीत होता...**

जेलस वाटणं हे जितकं त्रासदायक तितकंच ते जाणवणं वेदना देणारं. स्त्रियांना या जेलसीला जास्त सामोरं जावं लागतं, याचा अर्थ पुरुषांना असूया वाटत नाही असं मुळीच नाही. पण, नात्यात जास्त गुंतते ती स्त्री. तिचा संबंध रिलेशनशिप सांभाळण्यात अधिक येतो. ती तिच्या कुटुंबाबाबत लव्हिंग आणि केअरिंग असते. त्यातूनच जेलसीचा संबंध तिच्याशी जोडला जातो. प्रतिष्ठा, नावलौकिक, मुलांचं शिक्षण, सौंदर्य, सवयी, संस्कार, नवऱ्याचं प्रेम, घरातलं स्थान, कुटुंबातलं महत्त्व यांसारख्या बऱ्याच गोष्टी जेलसीशी जोडल्या गेल्या आहेत. या गोष्टी मिळण्यात कमीअधिक असणारंच. मला मिळत नाही यापेक्षा दुसऱ्याला मिळतंय याची खंत, याचे दुःख आपल्याला जेव्हा दिसतं तेव्हा जेलसीची भावना स्पष्ट दिसायला लागते. आपल्या मनात अनेक भावनांचे तरंग उमटत असतात. त्यातल्या काही पॉझिटिव्ह तर काही निगेटिव्ह असतात. पण, जेलसीच्या भावनेला मिळालेलं रेप्युटेशन हे वाईट समजलं जातं. जेलसीमुळे माणसाची नाती विस्कटतात. रोमॅन्टिक रिलेशनशिपमध्ये ही जेलसी खूप जास्त महत्त्वाची भूमिका निभावते. आपल्यासाठी जे खूप मौल्यवान आणि महत्त्वाचे असते ते गमावून बसण्याच्या भीतीतून ही असूयेची भावना निर्माण होत असते. जेलसी ही एनव्ही (असूया) पेक्षा निराळी असते. ही भावना अशी असते की जी गोष्ट आपली नसते ती आपल्याला हवी असते. जेलसीतून निर्माण होतो ॲन्गर, रिसेन्टमेन्ट किंवा सॅडनेस जो तुम्हाला तुमच्या आणि स्वतःच्या गरजांबद्दल सांगत असतो. अशी ही जेलसी मनात आली तर कठीण परिस्थिती निर्माण होते म्हणूनच ही जेलसी येते तरी कुठून? हे माहीत करून घ्यायला हवं...

### जेलसी येते कुठून?

- जेव्हा तुमच्या मैत्रिणीला बॉयफ्रेंड असतो. ती रोमॅन्टिक डेटवर जाते आणि तुम्ही बिच्चारे, लूजर समजता स्वतःला. कारण तुम्ही अजून सिंगल असता किंवा नवरा असतो. पण तो महाबोअर असतो. हे रोमॅन्टिक डेट वगैरे शोभतं का, असं म्हटलं जातं पण मनातून जेलसी वाटत असते.
- तुमच्या को-वर्करला प्रमोशन मिळतं. खरंतर तुम्ही डिझर्व्ह करत असता. मग संताप होतो. जेलसी निर्माण होते असं काय आहे हिच्यात जे माझ्यात नाही हे वाटत राहतं. आपल्यात काय कमी आहे हे शोधणं आपण विसरूनच जातो.
- आपली जीवश्चकंठश्च मैत्रीण अचानक आपल्यापेक्षा नवीन मैत्रिणीबरोबर जास्त गप्पा मारते, फोनवर बोलते, तिच्याबरोबर जास्त वेळ घालवते. इथे इनसिक्युरिटीतून येते जेलसी. मैत्रिणीवरचा अधिकार कमी होतोय या जाणिवेने बेचैनी.



### जेलसीतून मुक्त होण्यासाठी...

- तुम्हाला वाटणाऱ्या जेलसीचे मूळ असुरक्षितता, भीती, एखादी पास्ट रिलेशनशिप पॅटर्नस कशात आहे ते पहिल्यांदा शोधा.
- संबंधित व्यक्तीशी बोला. कारण, हे बोलणं जेलसीतून बाहेर येण्यासाठी खूप उपयोगाचं ठरतं. तुमचा बॉयफ्रेंड किंवा नवरा, बॉस, जुनी मैत्रीण यांच्याशी स्पष्ट बोला. शंकेचे निरसन करा.
- तुम्ही त्या व्यक्तीबाबत कन्सर्न आहात हे जरूर सांगा. जर तुमच्या वागण्यातला बदल त्यांच्या लक्षात येत नसेल तर त्याची जाणीव द्या.
- एखाद्या विश्वासू मित्र- मैत्रिणीशी या वाटणाऱ्या जेलसीबद्दल बोला. कारण, अशा मनस्थितीत आपल्याला जो ॲन्गल दिसत नाही तो समोरच्याला दिसतो. जेलसीत वस्तुस्थिती दिसत नाही. डोळ्यांवर एक पडदा पडला असतो जणू.
- जेलसी ही एक गुंतागुंतीची आणि स्ट्राँग इमोशन आहे. या इमोशनशी डील करताना फार चांगलं फील होत नसतं. अशावेळी या निगेटिव्ह गोष्टीतून बाहेर पडण्यासाठी जी व्यक्ती आपल्याला योग्य माहिती देईल अशा व्यक्तीची मदत जरूर घ्यावी. कारण, आपल्याकडे काय आहे आणि आपल्याला काय हवंय यातला फरक म्हणजे जेलसी.
- जेलसी ही भावना काढण्यासाठी मेडिटेशन अर्थात प्राणायाम आणि निद्रा, शांत झोप खूप उपयोगी ठरते.
- काही वेळेला फेसबुक, इन्स्ट्राग्रामवर तुमच्या मैत्रिणी त्यांच्या फॅमिलीबरोबर, विशेषतः नवऱ्याबरोबरचे सुंदर-सुंदर फोटोज शेअर करतात. ते लोक ग्रेट लोकेशन्सला जाऊन किती एन्जॉय करताहेत हे तुम्ही पाहता आणि तुम्हाला वाटतं काय लकी आहेत, काय मस्त लाईफ आहे. नाहीतर आपलं आयुष्य या चूल आणि मूल, काटकसर करण्यातच जायचं. खरं म्हणजे बहुतेकवेळा ते निव्वळ फ्लान्ट करणं म्हणजे दिखाऊपणा असतो. तुम्हाला जे चित्र दिसतं तसं नसतं. सतत भांडणं, वाद, कटकटी, द्वेष पण सेल्फी, फोटोज काढताना मात्र प्रेमाचा खोटा मुखवटा धारण केलेला असतो आणि आपण त्यालाच खरं मानून जेलस होतो. म्हणून खरं, वास्तववादी चित्र काय आहे त्याचा भानावर राहून विचार करा.
- आपल्याजवळ जे आहे त्याबद्दल स्वतःचे कृतज्ञ रहा. ग्रॅटिट्यूडची छोटीशीच भावना तुम्हाला आयुष्यात खूप पुढे घेऊन जाते. त्यातून फक्त जेलसीची भावनाच कमी होते असं नाही, तर मनावरचा ताणही निवळतो. प्रत्येकालाच जे हवं ते या लाईफमध्ये नाही मिळत. पण, तुम्हाला जे हवंय त्यातलं काहीतरी नक्कीच मिळतं. अशाकाही गोष्टी ज्या तुम्ही एक्स्पेक्टही नसतील त्या सुद्धा मिळतात आपल्याला. आपल्याजवळ काय नाही यापेक्षा काय आहे याचा शोध तुमच्या मनातल्या जेलसीची तीव्रता निश्चित कमी करते.
- तुम्हाला कसली जेलसी वाटते ते लिहून काढा. काय फील होतं ते नोटडाऊन करा. जेलसी वाटते अशा जागेपासून लांब जा. स्वतःच्या गुणांवर लक्ष केंद्रित करा. स्वतःची किंमत करा. तुमचे व्हॅलिडेशन अर्थात व्हॅल्यू समजून घेतली की आत्मविश्वास वाढून जेलसीची भावना कमी होऊ शकेल. मला काय हवंय? दुसऱ्याच्या ताटात वाढलेलं की माझ्यात स्वतःत असलेलं या विचारातून तुमचा सेल्फ रिस्पेक्ट वाढेल. तुमची इनफिरिअरिटी किंवा कॉम्पीटिटीव्हनेसची भावना कमी होत जाईल.
- माइंडफुलनेसची टेकनिक्स जजमेंटल न बनता तुमच्या विचार आणि भावनांना तुम्हाला ओळखायला मदत करतील. की हो मला जेलसी वाटू शकते पण स्वतःला थोडा वेळ द्या. ती भावना तात्पुरती हवी. काही वेळाने ती निघून जायला हवी हे स्वतःला सांगा. शेवटी हेच लक्षात ठेवायला हवं की, A flower does not think of competing to the flower next to it. It just blooms.

## मित्र असावा अस्सा!

**आयुष्यात एक मित्र तरी असावाच लागतो जो आपल्याला कोणत्याही परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी कायम तत्पर असतो. हा मित्र तुमच्या प्रत्येकवेळी आजूबाजूला नसला तरी तुमच्या आयुष्यात आलबेल आहे की नाही याची खबर ठेवतो. तुम्ही चुकता तेव्हा तुम्हाला ओरडायलाही कमी करत नाही. तुम्ही काही चांगलं करत असाल तर तुमची तारीफ करूनही थकत नाही. मैत्रीच्या अनेक व्याख्या सगळ्यांनी केलेल्या असल्या तरी देखील सर्वसाधारणपणे केवळ फायदा न पाहता तुमच्याही निखळ प्रेम करणारी व्यक्ती ही तुमच्या आयुष्यातील बेस्ट मित्र असू शकते. तुमच्याही आयुष्यात असा एक मित्र असेल तर तुम्ही त्यांच्यासोबत असे मुळीच वागू नका की ज्यामुळे तुमची मैत्री दावणीला लागेल...**

### खोटं बोलू नका...

कोणत्याही नात्यात खोटं बोलून अजिबात चालत नाही. मैत्री दोघांची असो वा मोठ्या ग्रुपची. जर तुम्ही त्यातील एका सदस्याशी खोटं बोलत असाल तरी देखील मैत्रीवर त्याचा परिणाम होऊ लागतो. खूप जणांच्या गटामध्ये एकाशी आपली मैत्री अधिक असू शकते हे अजिबात नाकारता येत नाही. कारण हा सर्वसाधारणपणे मानवी स्वभाव आहे. तुमची ग्रुपमध्ये एकाशीच मैत्री आहे हे अजिबात दिसता कामा नये. मैत्री टिकवताना एकमेकांशी खोट बोलावं लागेल अशी परिस्थिती अजिबात निर्माण करु नका. त्यामुळेही खूप वेळा अडचणी निर्माण येतात. (उदा. एखादी व्यक्ती जर तुमच्यावर खूप विश्वास ठेवत असेल पण तुमच्या स्वतःच्या फायद्यासाठी जर तिच्याशी खोटं बोलत असाल तर ते अजिबात चांगले नाही.)





### मैत्रीचा फायदा घेऊ नका

मैत्रीत सगळं काही माफ असतं हे खरं असलं तरी देखील मैत्रीत अनेकदा एखादी व्यक्ती कारण नसताना दुसऱ्या मित्राचा किंवा मैत्रिणीचा फायदा घेतो. हा फायदा पैशांचा नाही तर मानसिक सुद्धा असू शकतो. एखाद्या व्यक्तीचा मानसिक फायदा घेणे हे नेहमी चुकीचे. एखादी व्यक्ती जर तुमच्यावर खूप जास्त विश्वास ठेवत असेल तर अशा तुमच्या मित्रांसोबत तुम्ही त्या मैत्रीचा फायदा चुकीच्या गोष्टींमध्ये घेऊ नका. तुमच्या जवळच्या मित्राला तुमच्या मनात चालणारी वाईट गोष्टसुद्धा माहीत असते. त्यामुळे असे करताना तुमच्या मित्राचे मन दुखावले जाणार नाही याची काळजी घ्या.

### चांगला आणि योग्य सल्ला द्या

प्रत्येक जण काही ना काही चुका आयुष्यात करतच असतं. कोणी चुकत नाही असे मुळीच होत नाही. कधीकधी इमोशनल होऊन चुकीच्या मार्गावर जाणारे लोकंही तुम्ही नक्कीच पाहिले असतील. तर तुमचा जवळचा मित्र त्याच्या आयुष्याशी निगडीत चुकीचा असा निर्णय घेऊ पाहात असेल तर त्याला योग्य निर्णय घेण्यासाठी जी मदत करता येईल ती करा. कारण कधी कधी चुकीच्या मार्गाने जाताना तुम्ही त्यांना योग्य मार्ग दाखवला तर तुम्ही त्याला योग्य सल्ला योग्य वेळी द्याल असे होईल. आता मित्र असणे गरजेचे नाही ती मैत्री जपणे जास्त गरजेचे आहे.

## 'डेटिंग ॲप'वरून प्रेम करताना...

**एखाद्याला प्रेम अगदी पटकन आणि सहज मिळते, तर काही जणांना असे प्रेम मिळायला खूप अडचण येते. मनासारखा आणि योग्य जोडीदार मिळणे खूप जणांना कठीण जाते. अशावेळी डेटिंग ॲपचा आधारही खूप जण घेताना दिसतात. पण याच डेटिंग ॲपवरून कधी कधी विश्वासघात किंवा त्याहून वाईट घटना घडल्याचा अनुभव अनेकांना आला आहे. त्यामुळे डेटिंग ॲपवरून कोणत्याही गोष्टी करताना काही चुका ज्या भावनेच्या भरात वाहत जाऊन होतात, त्यांना तुम्ही रोखू शकता...**



- माहिती काढा : एखाद्या व्यक्तीची ओळख अशा डेटिंग ॲपवरून झाल्यानंतर त्याची थोडी माहिती काढण्यास काहीच हरकत नाही. बरेचदा खोटे किंवा मॉर्फ केलेले फोटो लावून काही जण केवळ टाईमपास करण्यासाठी एखाद्या अकाऊंटवरून एखाद्या मुलीशी किंवा मुलाशी चॅट करू पाहतात. खोट्या फोटोंमुळे खूप जण एखाद्याच्या प्रेमात पडण्याची शक्यता असते. इथेच तुम्हाला भावनांना थोडासा आवर घालायचा असतो. कोणताही फोटो पाहून त्याच्याशी लगेच सगळं शेअर करण्याआधी त्या व्यक्तीची माहिती तुम्ही काढून घ्या. माहिती काढल्यानंतर सोशल मीडियावर या व्यक्तीला शोधणे त्याची माहिती काढणे सहज शक्य होते.
- वैयक्तिक गोष्ट शेअर करू नका : कोणत्याही डेटिंग ॲपवरील व्यक्तीशी बोलायला घेतल्यावर तुम्ही त्याच्यावर जोपर्यंत संपूर्ण विश्वास बसत नाही तोवर त्याला कोणतीही वैयक्तिक माहिती सांगू नका. अशा वैयक्तिक माहितीमध्ये घराचा पत्ता, कामाचे ठिकाण, जीमचे ठिकाण किंवा तुमच्या काही खासगी जागा अशी काही माहिती तुम्ही अजिबात सांगू नका. अशा वैयक्तिक गोष्टी शेअर केल्यामुळेही तुम्हाला नुकसान होऊ शकते. यागोष्टी व्यतिरिक्त तुमची आर्थिक परिस्थितीही न सांगिलेलीच बरी. कारण त्यामुळेही अनेकदा फसवणूक होते.
- पैशांचे व्यवहार करू नका : डेटिंग ॲप हा एखाद्या हनी ट्रॅपसारखा असतो. यामध्ये खूप वेळा गोड बोलून एखाद्याकडून काहीतरी काढून घेण्याचा एखाद्याचा मनसुबा असू शकतो. एखादी व्यक्ती आपलं मन जिंकून घेते. मन जिंकून घेतल्यानंतर हळूहळू आपल्या समस्या सांगू शकते. पैशांची अडचण सांगून तुमच्याकडून पैसे काढून घेतले जातात. हल्ली डेटिंग ॲपची हीच भीती आणि धोका सगळ्यात जास्त लोकांना अनुभवायला मिळाला आहे. त्यामुळे ही चुकी करायला अजिबात विसरू नका.



- भेटायला जाताना... : एखाद्याशी खूप वेळ बोलल्यानंतर आणि त्याला जाणून घेतल्यानंतर भेटण्याची ओढ कोणालाही वेडी करू शकते. पण तुम्ही ज्याच्याकडे प्रेमाच्या भावनेने किंवा पार्टनर म्हणून विचार करत असाल तरी देखील त्या व्यक्तीचे प्रेम मिळवण्यासाठी तुम्ही त्याला भेटायला जाताना त्याला कुठे भेटत आहात हे देखील माहीत करून घ्या. भेटण्याचे ठिकाण हे नेहमी गर्दीचे आणि तुम्हाला माहीत असलेले ठिकाण निवडा. म्हणजे जर तुम्हाला ती व्यक्ती समोरून पटली नाही तर तुम्हाला तेथून निघणे सोपे जाईल.

## शॉर्ट न्यूज

### दारू पिऊन शिवीगाळ तरुणाविरुद्ध गुन्हा

■ **श्रीरामपूर :** शहरातील वार्ड क्रमांक दोनमध्ये जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला. तरुणाने महिलांची छेड काढण्याची धमकी दिली होती. आरोपीचे नाव सलमान शेख असे आहे. वार्डातील बजरंग चौक येथे दारू पिऊन आलेल्या सलमान याने मोठ्याने आरडाओरडा केला. त्याने एका तरुणाला जातीवाचक शिवीगाळ करत घरातील महिलांची छेड काढण्याची धमकी दिली. त्याला समजवण्याचा प्रयत्न केला असता सलमान याने तरुणाला धमकी दिली. नाना (पूर्ण नाव माहिती नाही) याच्या फिर्यादीवरून गन्हा दाखल करण्यात आला.

### कर्जाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

■ **पाथर्डी :** तालुक्यातील सुसरे येथील शेतकरी अरुण भानुदास कंठाळी (वय ४२), यांनी कर्जाला कंटाळूनन स्वतःच्या शेतामधील लिंबांच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करून रात्री उशिरा सुसरे येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अरुण कंठाळी यांच्याकडे सेवा सहकारी संस्था, खासगी बँकांचे व उसणवारीचे मोठे कर्ज होते. मुलांचे शिक्षण, मुलीचे लग्न व मुलींचे बाळांतपण, शेतीचा खर्च, यामुळे कंठाळी कर्जबाजारी झाले होते.

### प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

■ **केडगाव :** प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. केडगाव, लोंढे मळा येथे रात्री फ्लड लाईटमध्ये प्लास्टिक बॉलवर क्रिकेट स्पर्धा रंगत आहे. यामध्ये खेळाडूंचा उत्स्फूर्त सहभाग लाभला असून, शहर व उपनगरातील अनेक संघांनी यामध्ये सहभाग नोंदवला आहे. स्पर्धेच्या उद्घाटनाप्रसंगी विशाल गणेश मंदिराचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते, सुमती कोठारी, माजी नगरसेवक संजय लोंढे, नगरसेवक मनोज कोतकर आदी उपस्थित होते.

### दोन गटांत हाणामारी परस्परविरोधी गुन्हे दाखल

■ **कोपगाव :** शहरातील गांधीनगर भागात लहान मुलांच्या खेळण्यावरून झालेल्या वादाचे रूपांतर दोन गटात तुंबळ हाणामारीत झाले. त्यात पाचजण जखमी झाले. कोपरगाव शहर पोलिसांत एकमेकांच्या विरोधात तक्रारी देण्यात आल्याने पोलिसांनी दोन्ही गटांतील हाणामारी करणाऱ्यांची धरपकड सुरू केली आहे. फिर्यादीचा भाचा हा गांधीनगर येथील शंकर गार्डनमध्ये खेळत असताना किरकोळ कारणावरून वाद झाला. वरील आरोपींनी येऊन भाच्याला मारहाण करून जातीवाचक शिवीगाळ केली आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार शिंदे यांनी केली आहे.

### आश्वी बुद्रुक येथे दारूसाठा जप्त

■ **संगमनेर :** तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथे अवैधरीत्या दारू विक्री करणाऱ्या हॉटेलवर पोलिसांनी छापा टाकला. या छाप्यात सहा हजार ६१० रुपयांचा दारूचा साठा जप्त करण्यात आला. आश्वी पोलिसांना प्रतापपूर शिवारात असलेल्या एका हॉटेलात अवैध दारू विक्री सुरू असल्याची माहिती मिळाली होती. पोलिसांनी सदर ठिकाणी अचानकपणे छापा टाकून सहा हजार ६० रुपये किमतीच्या दारू साठा जप्त केला आहे. या प्रकरणी हवालदार आनंद वाघ यांनी फिर्याद दिली. त्यानुसार सोमनाथ गायकवाड याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# को.प. बंधारे व गे.सी. बंधारे योजनांना प्रशासकीय मान्यता

## खा. सुजय विखे यांच्या पाठपुराव्याला यश

**नगर : प्रतिनिधी**

**महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाकडून अहमदनगर जिल्ह्याच्या विविध तालुक्यांतील ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या सुमारे १५ को.प. बंधारे आणि गे.सी. बंधारे योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात असल्याची माहिती खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.**

को.प. बंधारे व गे.सी. बंधारे योजनांना प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी विशेष प्रयत्न केले होते. आज त्या प्रयत्नांना आणि वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाल्याने आनंद वाटत असल्याचे मत खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.

या योजनांच्या कामासाठी भरीव निधी मंजूर झाला असून मृद व जलसंधारण विभागाच्या सन २०२२-२३ च्या दरसूचीवर आधारित कामाप्रित्यर्थ सुमारे ८.५ कोटी रुपये व अनुषंगिक खर्चासाठी ६५ लक्ष रुपये अशा एकूण अंदाजित ९.५ कोटी रुपयांच्या किमतीस मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच सदर योजनांच्या प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकानुसार या बंधाऱ्यांची एकूण साठवण क्षमता ५३०.२८ स.घ.मी. असून नियोजित एकूण सिंचन क्षमता १९६ हेक्टर इतकी असल्याचे खासदार सुजय विखे यांनी सांगितले.



या योजनेमध्ये अहमदनगर जिल्ह्यातील विविध तालुक्यांचा समावेश करण्यात आला असून यापैकी नगर तालुक्यात दोन, पाथर्डी-५, पारनेर-२, श्रीगोंदा-३ आणि शेवगाव, जामखेड आणि कर्जत तालुक्यातील प्रत्येकी एका जागेची; अशा एकूण १५ जागा निश्चित करण्यात आल्या आहेत.

दरम्यान खासदार विखेंनी सदरील भरीव रकमेस मान्यता मिळवून दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार व्यक्त केले. तसेच जेव्हापासून महायुती सरकारने राज्याचा कारभार सांभाळला तेव्हापासून विविध विकासकामे ही वेगाने मार्गी लागत असल्याचे मत मांडले.

# ... अन्यथा पुन्हा बेमुदत उपोषणाला बसणार !

## मनोज जरांगेंचा राज्य सरकारला इशारा

**रायगड : प्रतिनिधी**

**मराठा समाजाला आरक्षण मिळावं म्हणून सगेसोयरे संदर्भात सरकारने काढलेल्या अधिसूचनेचं कायद्यात रुपांतर व्हावं. पुढील १५ दिवसांत विशेष अधिवेशन बोलावून हा कायदा पारीत करावा अशी मागणी मनोज जरांगे पाटलांनी केली आहे. मराठ्यांना सरसकट आरक्षण मिळालेलं नाही, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली होती. यावरून मनोज जरांगे पाटलांनी आता सरकारला इशारा दिला आहे. रायगड येथे मनोज जरांगे पाटील गेले होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे आशीर्वाद घेतल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी पुन्हा एकदा बेमुदत उपोषणाला बसणार असल्याचं जाहीर केले.**

''आज महाराष्ट्रातील मराठा समाजाला आणि सरकारला महत्त्वाचं सांगायचं आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की सगेसोयऱ्यांची जी अधिसूचना काढली आहे, त्याची तातडीने अंमलबजावणी करायला पाहिजे. प्रमाणपत्र वाटपाला सुरुवात झाली पाहिजे. तुम्ही हरकती-सूचना मागितल्या असल्या तरी तातडीने अंमलबजावणी होणं आवश्यक आहे'', असे मनोज जरांगे म्हणाले.

''पुढील १५ दिवसांत विशेष अधिवेशन बोलावून सगेसोयऱ्यांच्या अधिसूचनेचं कायद्यात रुपांतर करा. तसेच, तातडीने उद्यापासून या अधिसूचनेची अंमलबजावणी सुरू नाही केली तर १० फेब्रुवारीला बेमुदत उपोषण सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे'', असा इशारा मनोज जरांगे पाटलांनी दिला आहे.''या कायद्याची अंमलबजावणी वेळेत केली नाही किंवा दडपणाखाली जबाबदारी पार पाडली नाही तर आम्हाला पुन्हा अडचणीचे दिवस यायला नको. नोंदी मिळत नाहीत, समितीला मुदतवाढ दिलेली असतानाही समिती काम करत नाही. ज्यांची कुणबी नोंद मिळाली त्यांना प्रमाणपत्र वाटप होणं आवश्यक आहे. त्यामुळे आपण १०



फेब्रुवारीचा निर्णय घेतलेला आहे, अशी घोषणा मी रायगडाच्या पायथ्याशी करत आहे'', असेही जरांगे पाटील म्हणाले.

**अद्यापही गुन्हे मागे नाहीत**

''चार दिवस उलटून गेले तरी आंतरवाली सराटीसह महाराष्ट्रातील मराठा बांधवांवरील गुन्हे मागे घेतलेले नाहीत. तुम्ही तत्काळ शब्द वापरला आहे. सरकारकडून वेगवेगळे स्टेटमेंट येत आहेत. त्यामुळे सरकारची भूमिका आम्हाला कळत नाही. त्यामुळे १० फेब्रुवारीच्या आत गुन्हे मागे घ्यावे'', असा इशाराही जरांगे पाटलांनी दिला.

**हैदराबादचं गॅझेट स्वीकारावं**

''हैदराबादचे १८८४ चं गॅझेट चार दिवस उलटूनही स्वीकारलं नाही. रायगड चढतानाही मी याची माहिती घेत होतो. परंतु, अद्यापही हे गॅझेट स्वीकारण्यात आलेलं नाही. हे गॅझेट स्वीकारून त्याला शासकीय नोंदीचा दर्जा दिला पाहिजे. बॉम्बे गर्व्हमेंटचं गॅझेट स्वीकारलं नाही. १८८४ ची जनगणनाही स्वीकारावी. कारण शिंदे समितीकडे ते देणं आवश्यक आहे. १९०२ चा दस्तावेज घेतलेला नाही. ओबीसी आयोगाचा अहवाल जाणं महत्त्वाचा आहे.

**अधिसूचना टिकवण्याची जबाबदारी सरकारची**

सगेसोयरेबाबत राजपत्रित अधिसूचना दिली आहे. ही अधिसूचना टिकवण्याची जबाबदारी सरकारची आहे. कारण, सरकार आम्हाला सांगतं की ते टिकवलं जाणार आहे, असेही ते म्हणाले.

# अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

**ज्येष्ठ मराठी चित्रपट आणि नाट्य अभिनेते अशोक सराफ यांना कला क्षेत्रातील भरीव योगदानासाठी २०२३ वर्षाचा मानाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. मुख्यमंत्र्यांनी अशोक सराफ यांच्याशी बोलून त्यांचे अभिनंदनही केले. अशोक सराफ यांनी केवळ विनोदीच नव्हे तर गंभीर स्वरूपापासून ते खलनायकी प्रवृत्तीपर्यंत विविध छटांचे दर्शन आपल्या अभिनयातून घडविले आणि रसिकांवर अधिराज्य गाजवले असे मुख्यमंत्र्यांनी त्यांचे अभिनंदन करतांना म्हटले आहे. अशोक सराफ यांनी आत्तापर्यंत विविध सिनेमांमध्ये आणि नाटकांमध्ये अभिनय केला आहे.**



**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली माहिती**

मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेयांनी त्यांच्या एक्स हँडलवरुन ही माहिती दिली आहे. अशोक सराफ यांनी विनोदी, गंभीर आणि खलनायकी भूमिकाही साकारल्या आहेत. तसंच आपल्या अभिनयातून रसिकांच्या मनावर राज्य गाजवलं आहे. अशोक सराफ हे एक लोकप्रिय अभिनेते आहेत. मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये त्यांनी त्यांची कारकीर्द गाजवली आहे. लक्ष्मीकांत बेर्डे आणि अशोक सराफ यांची जोडी खूप गाजली होती. हम पांच या मालिकेतला त्यांचा अभिनय केला आहे. निवेदिता जोशी या त्यांच्या पत्नी आहेत.

# नगरमध्ये सकल ओबीसी भटक्या विमुक्तांचा शनिवारी महाएल्गार

## ■ लाखोंच्या संख्येने समाजबांधव येणार ■ स्वयंसेवकांच्या समित्या नियुक्त

**नगर : प्रतिनिधी**

**ओबीसी आरक्षणाला धक्का नलावता मराठा समाजाला आरक्षण द्यावे, अशी ओबीसी समाजाची भूमिका आहे. या पार्श्वभूमीवर शनिवारी, दि. ३ फेब्रुवारी रोजी क्लेराब्रुस हायस्कूल मैदान,अहमदनगरमध्ये ओबीसी महाएल्गार मेळाव्याचे आयोजन केले आहे. यामेळाव्याच्या यशस्वीतेसाठी जय्यततयारी सुरु असून स्वयंसेवकांच्याविविध समित्या नियुक्त केल्या आहेत.**

या महाएल्गार मेळाव्यात मंत्री व ओबीसी नेते छगन भुजबळ यांची तोफ धडधणार आहे. तसेच आमदार प्रकाश शेंडगे, कल्याण दळे, महादेव जानकर, गोपीचंद पडळकर, टी. पी.मुंडे, अन्सारी शेख, कल्याण दळे आदींची प्रमुख उपस्थिती असणार आहे.



या मेळाव्याच्या तयारीसाठी सकल ओबीसी भटक्या विमुक्तआघाडीच्या नेत्यांची नियोजन बैठक रोज होत आहे. यात जिल्हातील १४ तालुक्यांतील ओबीसी समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.ओबीसींचे २७ टक्के आरक्षण अबाधित राहावे. त्याला कुठलाही धक्का लागू नये. यासाठी मेळाव्याचे आयोजन केले जात असून क्लेरा ब्रूस हायस्कूलच्या मैदानावर स्टेज व बैठक व्यवस्थेचे काम सुरु आहे.

**विविध समित्या नियुक्त**

मेळाव्याच्या काटेकोर नियोजनासाठी स्वयंसेवकांच्या समित्या नियुक्त केल्या आहेत. वाहतूक व पार्किंग व्यवस्था,पाणीवाटप, आदी समित्या आहेत.आंदोलकांसाठी टोप्या व उपरणे शहरातील दुकानांमधून खरेदी केलेआहेत.

**प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी**

नाशिक, छत्रपती संभाजीनगर, बीड,पुणे ग्रामीण, बारामती, दौंड, सोलापूर,हिंगोली, मराठवाडा, धुळे, आदी ठिकाणहून समाजबांधव येणार आहेत. नियोजनाच्या आर्थिक मदतीसाठी प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमण्यात आले आहेत. जिल्ह्यातून आर्थिक मदत मेळाव्यासाठी १० लाख रुपयांहून अधिक खर्च अपेक्षित आहे. फक्त नगर जिल्ह्यातील समाजबांधवांकडून मदत स्वीकारली जात आहे. बाराबलुतेदार, शिक्षक संघटना, व्यावसायिकांनी ५० रुपये ते २१ हजार रुपयांची मदत देत आहेत.

# कोयत्याचा वार करून तरुणाचा खून

## श्रीगोंद्यातील कोथूळ येथील घटना



**श्रीगोंदा : प्रतिनिधी**

**श्रीगोंदा तालुक्यातील कोथूळ येथे अज्ञात चार जणांनी घरात घुसून पत्नीला चाकूचा धाक दाखवत पतीच्या गळ्यावर कोयत्याने वार करत गंभीर जखमी केले. या घटनेत योगेश सुभाष शेळके (वय ३५) या तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (ता.३०) पहाटे घडली. या प्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात आरती योगेश शेळके (वय २६) यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चार इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

घटनेचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून याप्रकरणी बेलवंडी पोलीस तसेच स्थानिक गुन्हेशाखा सर्व बाजूने सखोल तपास करत आहे. याप्रकरणी दोन संशयित इसमांना ताब्यात घेतल्याची माहिती मिळत असून इतर आरोपींच्या शोधात पोलीस पथके रवाना केले असल्याची माहिती पोलीस निरीक्षक संतोष भंडारे यांनी दिली. घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलीस अधिकारी विवेकानंद वाखारे यांनी धाव घेत पाहणी करून पुढील तपास कामी सूचना दिल्या.

# रूईछत्रपतीमध्ये वाढतेय बिबट्यांचं कुटूंब !

## ■ बिबट्याची तीन पिल्ले आढळली ■ परिसरात भितीचे वातावरण

**सुपा : प्रतिनिधी**

**उस तोड सुरू असताना तालुक्यातील रूईछत्रपती येथे उसाच्या फडामध्ये बिबट्याची तीन पिले आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. तालुक्याच्या अनेक भागांमध्ये बिबटयांची संख्या वाढत असतानाच रूईछत्रपतीमध्येही बिबट्यांचे कुटूंब वाढत असल्याने नागरीकांमध्ये चिंता वर्तविण्यात येत आहे.**



उस तोड सुरू असताना बिबटयाचे दर्शन झाल्याने मजुर गांगारून गेले. वन व वनपाल यांना वनपरिक्षेत्र कार्यायाकडून घटनास्थळी पाठविण्यात येऊन उसतोड तात्पुरती थांबविण्यात आली. रूईछत्रपती येथील पाझर तलावाच्या खाली पाणंद रस्त्यालगत शेतकरी दिनकर रावसाहेब दिवटे यांच्या शेतामधील उस मजुर तोडत होते. अचानकपणे बिबटयांच्या तीन पिल्ल्यांचे दर्शन झाल्याने मजुरांनी शेत मालकास त्याची माहीती दिली. शेतकरी दिवटे यांनी त्याबाबत वनविभागास माहीती दिल्यानंतर वनरक्षक उमाताई केंद्र यांनी घटनास्थळी भेट देत त्यांनी उपस्थितांना बिबटयाविषयी माहीती दिली. बिबटया समोर आल्यावर काय काळजी घ्यावी, बिबटया स्वतः हल्ला करीत नाही याबाबत त्यांनी जनजागृती केली.

रूईछत्रपती येथील टेंभी तलावालगत शास्वत पाणी उपलब्ध असल्याने यंदा मोठया प्रमाणावर उसाची लागवड करण्यात आली आहे. उस तोडणीला आल्यामुळे गेल्या आठ दिवसांपासून उस तोड सुरू आहे. तीन पीले आढळून आल्याने आणखी किती नर, मादी व पिले असतील या बाबात तर्क वितर्क लढविण्यात येत आहेत.

**मोरांचे वास्तव्य**

टेंभी तलावालगत भवानी मातेचे मंदिर असून तलावाच्या भरावाखाली विविध पाणी योजनांच्या विहीरी आहेत. या ठिकाणी झाडे झुडपे, घनदाट आरण्य असल्याने मोरांचे वास्तव्य मोठया प्रमाणावर असून दिवसेंदिवस मोरांची संख्याही वाढत आहे.

(पान १ वरून)

## कुजलेले अन्न खाल्ल्याने १७० मेंढया दगावल्या

मेंढयांना पोट फुगीचे औषध दिले. मात्र दि.२९ जानेवारी रोजी सकाळी सहा वाजेपर्यंत आणखी २० मेंढया दगावल्या.

औषध देऊनही मेंढया दगावल्याने बरकडे यांनी तात्काळ पशुसंवर्धन विभागाशी संपर्क करून माहीती दिली. पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतामध्ये येऊन आजारी शेळया, मेंढयांची तपासणी करून उपचार सुरू केले. १ शेळी व १ मेंढीचे शवविच्छेदनही करण्यात आले. शवविच्छेदन अहवालात शेळया, मेंढया तसेच गायीने कुजलेले अन्नपदार्थ खाल्ल्याने ॲडीडोसीस आजार होऊन त्या दगावल्याचा अहवाल प्राप्त झाला. दि.२९ जानेवारीपासून १ गाय, ४२ शेळया व २१० मेंढयांवर उपचार करण्यात आल्याचे सांगण्यात आले. आतापर्यंत दगावलेल्या शेळया, मेंढयांची संख्या १७० वर पोहचली आहे. दगावलेल्या शेळया मेंढयांचा महसूल विभागाच्या वतीने पंचनामा करण्यात आला आहे.

## 'नगर अर्बन'च्या संचालकांच्या मालमत्तेचा होणार लिलाव?

या मालमत्तांची किंमत निश्चित केली जाणार असून, या मालमत्तांचा लिलाव करून ठेवी परत केल्या जाणार असल्याची माहिती मिळाली आहे.

**चौकशी सुरु**

माजी अध्यक्षासह दोन संचालक सध्या अटकेत असून त्यांना एमआयडीसी पोलिस ठाण्यातील कारागृहात ठेवले जाते. नगर अर्बन बँकेचा गुन्हा आर्थिक स्वरूपाचा असल्याने आरोपींना चौकशीसाठी जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयात आणले जाते. दिवसभर त्यांची चौकशी सुरु असते अशी माहिती मिळाली आहे.

मंत्री विखेंनीही दिल्या होत्या कारवाईच्या सूचना

महसूलमंत्री राधाकृष्ण विखे यांनी देखील आरोपींच्या मालमत्ता जप्त करण्याच्या सूचना दिला होत्या. ठेवीदारांचे एक शिष्टमंडळ ज्यावेळी त्यांना भेटायला गेले होते त्यावेळी त्यांनी या कारवाईच्या सूचना दिलेल्या होत्या.

## जिल्हा सहकारी बँकेने पतसंस्थांना कॅश क्रेडिट सुविधा द्यावी

आली आहे. तालुक्यातील पतसंस्थाबाबत अविश्वासाचे वातावरण निर्माण झाल्याने काही समाजकंटकांसह काही राजकीय मंडळींकडून राजकीय हेतू डोळ्या समोर ठेवून या गोष्टीला खत पाणी घालून सहकार चळवळ मोडीत काढण्याचा प्रयत्न केला जात आहे तसे प्रयत्न त्यांच्याकडून होताना दिसत आहेत.या पार्श्वभूमीवर पतसंस्था चळवळ टिकवण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

सहकार चळवळीला,पतसंस्था चालकांना,गोरगरीब जनतेला, व ठेवीदारांना विश्वास देण्यासाठी आज मुंबई येथे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील याची भेट घेऊन सकारात्मक चर्चा करून यातून मार्ग काढण्यासाठी निवेदन देऊन जिल्हा बँकेमार्फत सभासद पतसंस्थांना कॅश क्रेडिट तसेच त्यांचे बॅलन्स शीट पाहून पूर्ण कायदेशीर खात्री केल्यानंतर काही ठराविक पतसंस्थेंना जिल्हा बँक एक'' पालकत्व'' सहकारी संस्था म्हणून काही बँकेमार्फत कशी आर्थिक मदत करण्याच्या दृष्टीने शासन दरबारी वरिष्ठ सहकार विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून तसेच मा. आयुक्त सहकार ,पुणे यांच्याशी समक्ष चर्चा करून यामध्ये काही मार्ग सहकार चळवळ टिकवण्याच्या व सामान्य ठेवीदारांचे आर्थिक नुकसान होऊ नये या दृष्टीने मा. सहकार मंत्री यांनी मुंबई येथे बैठक आयोजित करू असे आश्वासन मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी दिले.

**प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करा**

प्रशांत तू जिल्हा सहकारी बँक व मजूर संस्थाचा प्रतिनिधी आहेस.सहकारी संस्था अधिक बळकटीकरण होण्याच्या दृष्टीने नगर जिल्ह्यात एक दिवसाचे प्रशिक्षण शिबीर घ्यावे.या शिबिरासाठी मी स्वतः उपस्थित राहिल.अशी सूचना सहकार मंत्री दिलीप वळसे यांनी प्रशांत गायकवाड यांना केली.यावेळी जिल्ह्यातील इतर सहकारी संस्थांची माहिती सहकार मंत्री वळसे पाटील यांनी प्रशांत गायकवाड यांच्याकडून घेतली.

# पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांच्या हाती झाडू !

## शहरात सफाई करीत दिला स्वच्छतेचा संदेश




**स्वच्छतेला महत्व द्या**

**प्रत्येकाने आपल्या जीवनामध्ये स्वच्छतेला महत्व द्यावे. प्रत्येकाने आपला परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी घेतली तर देश स्वच्छ होईल.**

**विनय शिपाई, मुख्याधिकारी, पारनेर नगरपंचायत**

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर शहरातील पारनेर पब्लिक स्कुल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स शैक्षणिक संकुलाच्या नववीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी हाती झाडू घेत मंगळवारी पारनेर शहरातील विविध ठिकाणांची सफाई केली. शिक्षण संकुलाचे प्राचार्य गिताराम म्हस्के यांनी ही माहिती दिली.**

म्हस्के यांनी सांगितले की मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानांतर्गत शिक्षण संकुलाच्या वतीने स्वच्छता अभियान राबविण्यात येत असून त्याचाच एक भाग म्हणून पारनेर नगर पंचायत हद्दीतील पारनेर बाजार तळ, ग्रामीण रूग्णालय, पारनेर पोलीस स्टेशन आदी ठिकाणी स्वच्छता मोहिम राबविण्यात येऊन स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. या स्वच्छता मोहिमेमध्ये पारनेर नगरपंचायतचे मुख्याधिकारी विनय शिपाई, ग्रामीण रूग्णालयाच्या डॉ. सुवर्णा लोळगे, पारनेर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर उपस्थित होते.

**स्वच्छतेबरोबरच चांगला अभ्यास करा**

**जीवनामध्ये स्वच्छतेला अतिशय महत्व आहे. स्वच्छतेबरोबरच चांगला अभ्यास करून आपले ध्येय निश्चित करीत समाजामध्ये एक चांगले अधिकारी होऊन समाजाचे नेतृत्व करावे.**

**समीर बारवकर**
**पोलीस निरीक्षक,पारनेर पोलीस स्टेशन**

केवळ देखावा म्हणून नाही तर या मोहिमेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्सफुर्तपणे सहभाग नोंदवत विविध ठिकाणे चकाचक करीत पारनेर पब्लिक स्कुलच्या लौकीकास साजेशी स्वच्छता मोहिम राबविली. कोणत्याही उपक्रमात आम्ही आमचे शंभर टक्के योगदान देत हा उपक्रम यशस्वी करतो अशी प्रतिक्रीया देत विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हा उपक्रम अतिशय स्तुत्य आहे, त्यातून स्वच्छतेचे महत्व अधोरेखीत झाल्याचे सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी ग्रामीण रूग्णालयातील विविध विभागांना भेटी देत तिथे चालणाऱ्या कामकाजाची माहीती घेतली.

**विद्यार्थ्यांमध्ये उत्साह**

**मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा हे अभियान राबविताना विद्यार्थ्यांमध्ये उत्साह दिसून येत आहे. स्वच्छतेचे महत्व अधोरेखित झाल्याने विद्यार्थी स्वतः स्वच्छतेसाठी पुढाकार घेऊ लागले असून ही या अभियानाची फलनिष्पत्ती म्हणावी लागेल.**

**गिताराम म्हस्के**
**प्राचार्य, पारनेर पब्लिक स्कुल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स**

या अभियानात शिक्षण संकुलाचे संस्थापक प्राचार्य गिताराम म्हस्के, सचिन मोढवे, दीपक जाधव, दत्तात्रेय काकडे, योगिता राऊत, राहुल ठुबे, योगेश दुधाडे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# ईव्हीएम हटाव व इतर मागण्यांसाठी पारनेरात धरणे

## लोकशाही व संविधान बचाव अभियानाचा पुढाकार

पारनेर : प्रतिनिधी

मनुवादी शासकवर्ग आणि धनदांडगा भांडवलदार यांनी पुन्हा एकदा भारतीय जनतेला गुलाम बनविण्याचे षडयंत्र सुरू केल्याचा आरोप करीत मताधिकार गिळंकृत करणाऱ्या आणि देशाची लोकशाही व संविधानाची हत्या करू पाहणाऱ्या ईव्हीएम मशिनला निवडणूक प्रक्रियेतून हद्दपार करण्याच्या मागणीबरोबरच इतर मागण्यांसाठी लोकशाही व संविधान बचाव अभियानाच्या वतीने सोमवार दि. ५ फेब्रुवारी रोजी तहसिल कार्यालयासमोर धरणे आंदोलन प्रदर्शन करण्यात येणार आहे.

ईव्हीएम मशिनचा वापर बंद करून बॅलेटपेपरवर निवडणूका घेण्यात याव्यात, सरकारी अधिकारी, कर्मचारी यांची कंत्राटी पध्दतीने करण्यात येणारी भरती बंद करावी, सरकारी शाळा बंद करून खाजगी कंपन्यांना देण्याचा शासन निर्णय आणि शिक्षणाचे खाजगीकरण करण्याचे धोरण ताबडतोप रद्द करावे, महसूल, भुमि अभिलेख,पंचायत समिती व इतर सरकारी कार्यालयात अधिकारी



व कर्मचारी यांच्याकडून होणारी पिळवणूक थांबविण्यात यावी, दप्तर दरंगाई कायदा अंमलात आणावा, जि प, पं. स द्वारे राबविण्यात येणाऱ्या वैयक्तीक व सार्वजनिक योजनांमध्ये होणारा भ्रष्टाचार, निकृष्ट दर्जा व अफरातफरीची चौकशी करण्यात यावी, शेती उत्पन्नावर कर लावण्याचे धोरण स्थगित करण्यात यावे. शेत मालास हमी भाव द्यावा, हिट ॲण्ड रन प्रकरणी देशातील वाहनचालकांच आणि त्यांच्या कुटूंबियांचे जीवन उध्वस्त करणरा कायदा रद्द करावा, खाजगी भांडवलदारांच्या कोळशाच्या खानीसाठी छत्तीसगडमधील जंगलाची तोड करून आदीवासींन बेघर करण्याचे धोरण थांबविण्यात यावे, लोकसभा, विधानसभाा, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विविध प्रवर्गासाठी स्वतंत्र मतदारसंघांची रचना करावी, जुलमी कर प्रणाली, जीवनावश्यक वस्तूंवरील कर वसुली थांबविण्यात यावी आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

निवेदनावर राजेंद्र करंदीकर, हसन राजे, बाळासाहेब पातारे, अविनाश देशमुख, गणीभाई इनामदार, प्रदीप मोर, मनोज सुर्यवंशी, प्रमोद नगरे, रामहरी भोसले, रविंद्र साळवे रफीक राजे, सुनिल इघाटे, योगेश सोनवणे, संपत पाडळे, मयुर करंदीकर, जगन्नाथ बोरूडे, मोहन विधाटे, श्यामराव साळवे विठ्ठल जाधव, विनोद तांबे, संतोष गायकवाड, सुनील शेळके यांच्या सह्या आहेत.

# कारखिले यांच्या कार्यकुशल नेतृत्वाची दखल

## राधाकृष्ण विखे यांचे गौरवोदगार



**भाजपा युवा मोर्चाच्या पारनेर तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल पंकज कारखिले यांचा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**

निघोज : प्रतिनिधी

**राळेगण थेरपाळचे लोकनियुक्त सरपंच पंकज कारखिले यांनी निघोज पंचायत समिती गणामध्ये मोठया प्रमाणावर विकास कामे मार्गी लावली असून त्यांच्या कार्यकुशल नेतृत्वाची दखल घेउन त्यांच्यावर तालुका भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष म्हणून जबाबदारी सोपविण्यात आल्याचे गौरवोदगार पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी काढले.**

युवा मोर्चाच्या तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल कारखिले यांचा विखे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. पदाच्या माध्यमातून कारखिले हे भाजपाची ध्येय धोरणे तळागाळापर्यंत पोहचवून संघटन वाढविण्यात यशस्वी होतील असा विश्वास विखे यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, कुणाल उद्योग समुहाचे अध्यक्ष सुखदेव पवार, सुप्याचे उपसरपंच दत्तानाना पवार आदी उपास्थित होते.

यावेळी बोलताना विखे यांनी भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील यांचेही कौतुक केले. तालुकाध्यक्ष म्हणून काम पाहताना शिंदे यांनी तालुक्यात चांगले संघटन केले असून पंकज कारखिले, दत्ता नाना पवार आदी असंख्य युवकांची त्यांना साथ असल्याने तालुक्यात भाजपा हा एक प्रबळ पक्ष म्हणून नावारूपास येत असल्याचे विखे म्हणाले. युवा मोर्चाचे नवनियुक्त अध्यक्ष पंकज कारखिले म्हणाले, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, खा. डॉ. सुजय विखे यांच्या माध्यमातून तालुक्यात मोठया प्रमाणावर विकास कामे मार्गी लागली असून त्याचा फायदा भाजपाची ताकद वाढण्यास होत आहे. आगामी लोकसभा निवडणूकीत खासदार डॉ. सुजय विखे यांना पारनेर तालुक्यातील मतदार विक्रमी मताधिक्य देतील अशी ग्वाही कारखिले यांनी यावेळी दिली.

# श्रीहरी पवळे यांना श्रीरंग कला गौरव पुरस्कार प्रदान

## पुणेकरांनी केला रांगोळीरांचा गौरव

सुपा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील नारायणगव्हाण येथील ह.भ. प.आप्पासाहेब पवळे महाराज यांचे ज्येष्ठ चिरंजीव सुप्रसिद्ध रांगोळीकार श्रीहरी पवळे यांचा पुणेकरांनी श्रीरंग कला गौरव पुरस्कार देऊन गौरव केला.**




(छाया – शरद रसाळ, सुपा)

श्रीरंग कला दर्पण फाउंडेशन आयोजित बालगंधर्व रंगमंदिर पुणे येथे जय जगन्नाथ प्रदर्शनात ८० कलाकारांनी अभूतपूर्व रांगोळ्या रेखाटल्या या प्रदर्शनाचे उद्घाटन शरदचंद्र प्रतापे महाराज व ज्योतिषाचार्य अतुल शास्त्री भगरे गुरुजी यांच्या हस्ते झाले. पुरी येथील जगन्नाथ मंदिराची प्रतिकृती इतिहास व रहस्य यांच्या कथा आणि लीला यावर आधारित प्रदर्शनात ३२ रांगोळ्या ८० कलाकारांनी रेखाटल्या. हे प्रदर्शन ३ फेब्रुवारी पर्यंत सकाळी नऊ ते रात्री आठ दरम्यान बालगंधर्व कलादालनात सर्वांसाठी खुले आहे.

उद्घाटन प्रसंगी ज्येष्ठ रांगोळीकार जगदीश चव्हाण सुप्रसिद्ध रांगोळीकार श्रीहरी पवळे संस्थापक अध्यक्ष अक्षय शहापूरकर व नीता पवार आदी उपस्थित होते. सुप्रसिद्ध रांगोळी कार श्रीहरी पवळे हे श्रीरंग कला गौरव पुरस्कार रांगोळी क्षेत्रातील मोठ्या योगदानाबद्दल पुरस्काराचे मानकरी ठरले. चाहते वर्गातून श्रीहरी पवळे यांचे कौतुक होत आहे.

या रांगोळी प्रदर्शनाचं वैशिष्ट्य म्हणजे जय जगन्नाथ पुरीची फक्त कथारूप माहिती होती ती आता चित्ररूपाने सर्वांना माहिती होईल. या रांगोळी प्रदर्शनात वैशिष्ट्यपूर्ण विविध प्रकारच्या रांगोळ्या रेखाटलेले आहेत पाण्याखालची रांगोळी पाण्यावरची रांगोळी पाण्याच्या मधली रांगोळी आयोजकांकडून विनंती करण्यात येत आहे की आपण या रांगोळी प्रदर्शनाला अवश्य भेट द्यावी. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृष्णा रत्नपारखी सही शहापूरकर रोहन विनके यांनी केले तर आभार अजित पवार यांनी मानले.

# विकास फिरोदियाची श्री साईनाथ विद्यालयास देणगी

## दहा वर्षापासून दर वर्षी पाच हजारांची देणगी

अळकुटी : प्रतिनिधी

**आपण ज्या शाळेत शिक्षणाचे व जीवन जगण्याचे धडे घेतले त्या आपल्या शाळेविषयीचे ऋण फेडण्याची संधी प्रत्येक माजी विद्यार्थी शोधत असतो व आपल्या कुवतीनुसार शाळेस आर्थिक किंवा अन्य माध्यानातून ती मदत देवून ऋण फेडत असतो. हाच आदर्श समोर ठेवत अळकुटी येथील रहिवासी व सध्या पुणे येथे वास्तव्यास असलेल्या श्री साईनाथ विद्यालयाचा माजी विद्यार्थी विकास प्रकाश फिरोदिया याने आजी स्व. सदाबाई सुरजमल मुथियान यांच्या स्मृती प्रित्यर्थ श्री साईनाथ विद्यालयास १० हजार २४ रुपयांची देणगी दिली आहे.**

विकास फिरोदिया आपल्या आजीच्या स्मृतीप्रित्यर्थ गेली दहा वर्षांपासून दर वर्षी ५ हजार रुपयाची देणगी विद्यालयास देत आहेत व ती निरंतर यापुढेही चालू ठेवणार असून आतापर्यंत एकूण ६० हजार रुपयांची देणगी श्री साईनाथ विद्यालयास दिली आहे. विकासच्या आपल्या शाळेप्रती असलेल्या सामाजिक बांधिलकी बद्दल शालेय विद्यार्थी व ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.



**श्री साईनाथ विद्यालयाचे प्राचार्य मंगेश जाधव यांचेकडे देणगी सुपूर्द करताना राजूशेठ मुथियान (छायाः मंगेश पारखे)**

या उपक्रमाबद्दल विकासचे रयतचे विभागीय अधिकारी तुकाराम कन्हेरकर, स्थानिक स्कुल कमिटीचे अध्यक्ष बाबाजी भंडारी, प्राचार्य मंगेश जाधव, पारनेर तालुका जैन संघटनेचे अध्यक्ष कुंदनकाका साखला, सरपंच डॉ. कोमल भंडारी, उपसरपंच बाळासाहेब धोत्रे, सेवा संस्थेचे अध्यक्ष सुभाष पुंडे , माजी चेअरमन बाळासाहेब पुंडे, अळकुटी पतसंस्थेचे अध्यक्ष महेश शिरोळे, संजय मते, माजी उपसरपंच आरिफ पटेल तसेच स्थानिक स्कूल कमिटी सदस्य व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

# अबॅकस स्पर्धेत गुरूदेवचे चार विद्यार्थी फस्ट रँकमध्ये

## २२ विद्यार्थ्यांना इतर रँकमध्ये यश



सुपा : प्रतिनिधी

**नगर येथे पार पडलेल्या नॅशनल अबॅकस स्पर्धेत सुपा येथील गुरूदेव प्रशालेच्या ४ विद्यार्थ्यांनी फस्ट रँक मिळवित प्रशालेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. प्रशालेच्या २२ विद्यार्थ्यांनीही इतर रँक मिळवित यश संपादन केले. इन्स्पायर अकॅडमीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेत राज्यातील ७२८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.**

या स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना आ. संग्राम जगताप, माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी पुणे येथील शिक्षण संचालनालयाचे अधीक्षक अशोक बागल, शिक्षण परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडके, रयत शिक्षण संस्थेचे सदस्य ज्ञानदेव पांडूळे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष रोहिदास कर्डीले हे यावेळी उपस्थित होते.

यशस्वी विद्यार्थ्यांना अबॅकस प्रशिक्षक भाग्यश्री कोठे व सचिन कोठे यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक सुभाष मगर यांनी बक्षिस देत गौरव केला. यावेळी बोलताना संस्थेचे अध्यक्ष संतोष मगर यांनी सांगितले की, अबॅकसमुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढते. तार्किक समज सुधारते. गणिती प्राविण्य मिळते. कल्पनाशक्ती वाढते. आत्मविश्वास, स्मरणशक्ती, मेंदूची कार्यक्षमता वाढते. वेग व अचूकता सुधारून ताण तणाव कमी होतो. त्यामुळेच गुरूदेव शिक्षण संस्थेने पुर्णवेळ अबॅकस शिक्षकांची नियुक्ती केली आहे.

**यांनी मिळविली फस्ट रँक**

**गुरूदेव प्रशालेल्या दुसऱ्या इयत्तेत शिकणाऱ्या सुजय पोपट थोरात याने फाउंडेशन लेव्हलला पाच मिनिटात १८६ सम सोडवून फस्ट रँक मिळविली. किडस् प्रायमरी गटात भुमी संदीप शेळके, गुरूप्रसाद संतोष येणारे, राजलक्ष्मी संभाजी मगर यांनी फस्ट रँक मिळविली.**

**इतर रँक मिळविणारे विद्यार्थी**

**इतर विजेत्यांमध्ये फाउंडेशन लेव्हलमध्ये वेदिका ठोकळ, सृष्टी रासकर, आराध्या थोरात, आराध्या दिवटे, श्रवण थोरात, श्लोक भालेकर, रिध्दी येणारे, भक्ती नवले, आकाश पुरोहित, प्रसाद येणारे, आरोही बागल, मंजुश्री रासकर, वेदिका मगर, आयुश ठुबे. तर किडस लेव्हलमध्ये कार्तिकी घवले, शौरीश साबळे. प्रायमरी लेव्हल तनिष्का परांडे, शेजल रासकर, समीर तायडे, श्रावणी तरटे, प्रणील तुपे, स्नेहल चितळकर.**

# राळेगणसिद्धीत अण्णासाहेब हजारे महावक्ता करंडक स्पर्धा

## आडवाटेचं पारनेर, स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी व नागेश्वर मित्र मंडळाचा उपक्रम

पारनेर : प्रतिनिधी

**विद्यार्थी व युवकांमध्ये वक्तृत्व कला विकसित व्हावी म्हणून राळेगणसिद्धी येथे ३ फेब्रुवारीला स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी, आडवाटेचं पारनेर व साहित्य साधना मंच,नागेश्वर मित्र मंडळाचे वतीने पद्मभूषण डॉ अण्णासाहेब हजारे महावक्ता करंडक वक्तृत्व स्पर्धाचे आयोजन केल्याची माहिती आडवाटेचे पारनेरचे प्रमुख प्रा.तुषार ठुबे व विनोद गोळे यांनी दिली.**

स्पर्धेचे दुसरे वर्ष असून प्रसिद्ध साहित्यिक संजय पठाडे यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा होणार आहेत.स्पर्धासाठी चेतन ट्रेडिंग कंपनीचे प्रमुख चेतन भळगट, चंदन भळगट, व कान्हुरपठार येथील अब्बास मुजावर, दिलीप लोंढे,बी.एम.ठुबे, अंजाबापु ठुबे यांचे सहकार्य मिळाले आहे.

तालुक्यातील चौथी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी लहान गट असून यामध्ये फक्त पारनेर तालुक्यातील विद्यार्थीना सहभागी होता येणार आहे.पारनेर तालुका -पराशरांची भुमी, आदर्श गाव माझी संकल्पना, क्रांतीकारक सेनापती बापट,झाडे लावा झाडे जगवा, धगधगता अंगार छत्रपती संभाजी महाराज, पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांचे जीवन व कार्य हे विषय आहे. आठवी ते बारावी




या गटात पारनेर तालुकासह नगर जिल्ह्यातील व शिरूर तालुक्यातील विद्यार्थी साठी स्पर्धा खुली असून शेतकरी बाप,जगाचा पोशिंदा, आदर्श गाव माझी संकल्पना, आता नकोय यंत्र संवाद,हवाय हृदय संवाद,मराठी शाळा, आठवणी व भविष्य ,पाणी आडवा पाणी जिरवा, पद्मभूषण अण्णासाहेब हजारे जीवन व कार्य आहे.

महाविद्यालय गटात राज्यातील विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार असून स्पर्धासाठी चक्रव्यूहात अडकलेला अभिमन्यू -मतदार, आम्ही जिजाऊ सावित्रीच्या लेकी, राष्ट्र निर्मिती साठी युवकांची भूमिका, स्वामी विवेकानंद - कर्मयोगी सिद्ध पुरुष, पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांचे जीवन व कार्य,ज्ञानदेवी रचिला पाया तुका झालासे कळस हे विषय आहे. राळेगणसिदधी येथील हिंद स्वराज्य ट्रस्ट च्या सभागृहात स्पर्धा होणार असून महाविद्यालय व विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शाळेचे ओळखपत्र घेऊन यावे असे आवाहन अशोक गायकवाड, प्रा संकेत ठाणगे यांनी केले आहे.

# खेळामधून सकारात्मक उर्जा तयार होते

## ■ धनश्री विखे यांचे प्रतिपादन
## ■ नवोदय विद्यालयात शाळांना फुटबॉलचे वाटप

टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी

**विविध खेळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनामध्ये सकारात्मक उर्जा तयार होते व विद्यार्थी नकारत्मकता विसरतो असे प्रतिपादन धनश्री सुजय विखे यांनी केले.**

(छाया : संजय मोरे)



**कार्यक्रमांकडे शाळांची पाठ**

**पारनेर तालुक्यात सत्तरहून अधिक माध्यमिक विद्यालये आहेत. या कार्यक्रमाविषयी सर्व शाळांना लेखी कळविण्यात आलेले असतानाही शिवाय माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांची उपस्थिती असतानाही केवळ १३ शाळांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदविला.**

टाकळी ढोकेश्वर येथील नवोदय विद्यालयात विविध शाळांसाठी फिफा या केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत तालुक्यातील विविध शाळांना फुटबॉलचे वितरण विखे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक कडूस, जिल्हा क्रिडा अधिकारी दिलीप दिघे, पंचायत समितीच्या माजी सदस्या प्रतिभा खिलारी, ग्रामपंचायत सदस्या पुजा झावरे, अर्चना रांधवन, डॉ. भाऊसाहेब खिलारी, खरेदी विक्री संघाचे चेअरमन ॲड. बाबासाहेब खिलारी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना खिलारी म्हणाल्या, शैक्षणिक जीवनात प्रगल्भता येण्यासाठी खेळ महत्वाचा आहे. विद्यार्थी खेळामधील पराभव खिलाडू वृत्तीने स्विकारतो. त्यातून त्याच्या मनामध्ये आत्महत्येसारखे विचार येत नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून फुटबॉल खेळाचे महत्व वाढावे म्हणून फुफा अंतर्गत विविध शाळांसाठी हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे विखे म्हणाल्या. यावेळी विखे यांच्या हस्ते टॉस उडवून फुटबॉल सामन्याचे उदघाटन करण्यात आले.

प्राचार्य एस.पी.बोरसे यांनी सांगितले की विखे परिवाराच्या संकल्पनेतून टाकळी ढोकेश्वर सारख्या ग्रामीण भागात नवोदय विद्यालय उभे राहिले असून सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडविण्याचा या विद्यालयाचा उददेश असल्याचे सांगितले. पी बी पवार यांनी सुत्रसंचलन केले. उपप्राचार्य मुन्नरवार यांनी आभार मानले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com